फौजदारी किरकोळ अर्ज क्र.०१/२०१८ मधील
निशाणी क्र.१ खालील आदेश
(CNR NO. MHJG12-000004-2018)

सदर अर्जाद्वारे अर्जदार अर्जदाराने त्याचे मालकीची टाटा इंडीगो चारचाकी वाहनाचा ताबा मिळणेकामी विनंती केलेली आहे.

२. अर्जदाराच्या हकीकतनुसार, तो मेहुणबारे पोलीस स्टेशन गु.र.नं.५७/२०१७ मध्ये जप्त मुद्देमाल टाटा इंडीगो (सी.एस.टी.डी.आय., एल.एक्स.) क्र.एमएच-४३/एबी-४१४८ ही सन २०१४ मध्ये त्याने श्री.औजीनाथ मुरलीधन शेवाळे रा.कुकाणे, ता.मालेगांव जि.नासिक यांना दिनांक २३.०७.२०१४ रोजी विक्री केलेली असुन सदर गाडीचा व्यवहार त्यांचेत झाला आहे. परंतु सदर वाहनावर महिंद्रा ॲण्ड महिंद्रा फायनान्स कंपनीचे कर्ज असलेने सदर कर्ज हे वरील त्यांना श्री. शेवाळे यांनी भरावयाचे होते व सदर कर्ज निल झालेनंतर सदरचा व्यवहार पुर्ण होऊन महाराष्ट्र राज्य प्रादेशीक मंडळाकडुन रितसर त्यांचे नावाने करुन देणेचे ठरले होते. त्याबाबत तसा करारनामा नोटरीसमक्ष नोंदविण्यात आलेला आहे. श्री.औजीनाथ यांनी फायनान्स कंपनीचे हप्त न भरल्याने सदरचा व्यवहार संपष्टात आलेला आहे. करीता अर्जदार हाच सदर वाहनाचा कायदेशीर मालक आहे. अर्जदाराला, नमुद वाहनाची दैनंदिन कामासाठी आवश्यकता असते. तसेच, सदर वाहन पोलीस ठाण्यात पडुन राहील्यास त्याचे ट्युब, टायर वगैरे खराब होण्याची व इतर लोखंडी पार्टस् गंजण्याची शक्यता आहे. अर्जदार योग्य त्या अटी व शर्ती पाळण्यास तयार आहे.

३. तपास यंत्रणेने त्यांचे म्हणणे <u>निशाणी ०६</u> अन्वये सादर केले आहे.

तपास यंत्रणेने त्यांच्या खुलाशात सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देण्यास हरकत नसल्याचे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. अभियोगपक्षाने त्यांचे म्हणणे निशाणी ०१ वर सादर करुन, सदर वाहन अर्जदाराचे ताब्यात देण्यास हरकत असल्याचे नमुद केलेले आहे.

४. सबब, दोन्ही पक्षांचे युक्तीवाद ऐकण्यात आले. अर्जात नमुद हकीकत आणि सादर कागदोपत्री पुराव्याच्या पार्श्वभुमीवर, अर्जदार हा सकृतदर्शनी जप्त वाहनांचा मालक असल्याचे दिसुन येते. अर्जदार व्यतिरिक्त आजपावेतो इतर कोणत्याही ति-हाईत पक्षाने सदर वाहन संदर्भात प्रतिदावा केल्याचे दिसुन आलेले नाही. त्याचप्रमाणे, जप्त वाहनाचे तांत्रीक स्वरुप पाहता, ते कोणत्याही वापराशिवाय एकाच ठिकाणी पडुन राहिल्यास तर ऊन, पाऊस इ. नैसर्गिक कारणांमुळे त्याचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता, खालील हुकूम करण्यात येत आहे.

## आदेश

१. अजर्दाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदाराने संबंधीत पोलीस ठाणे येथे रु.३,००,०००/- (रु.तिन लाख मात्र) चे सुप्रुतनामा बंधपत्र सादर केल्यास, तर त्याला मेहुणबारे पोलीस ठाणे गु.र.नं.५७/२०१७ मधील जप्त वाहन टाटा इंडीगो क्र.एमएच-४३/एबी-४१४८, चेसीस MAT607161 AWB10287, इंजिन नं.4751DT14BZYP17787 चा तात्पुरता ताबा देण्यात यावा.

३. अर्जदाराने नोंद घ्यावी की, येथुन पुढे नमुद वाहनांचा अशाच प्रकारच्या तथाकथित गुन्ह्याकामी वापर होणार नाही. तसेच त्या वाहनाचे मुळ स्वरुपात कोणताही बदल करु नये.

४. तपास यंत्रणेस निर्देष देण्यात येत आहे की, सदरहू जप्त वाहनाचा तात्पुरता ताबा अर्जदारास देतांना त्या वेळी सदरहू जप्त वाहनाचे योग्य ते फोटो काढुन तसा रितसर पंचनामा करावा व तसे सुप्रुतनामा बंधपत्राची प्रत, फोटो व पंचनाम्याची प्रत दोषारोप पत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी सादर करावी.

येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक -२४/०१/२०१८ न्यायदंडाधिकारी, प्र.व., चाळीसगांव.